# सातारा जिल्हा परिषद,सातारा

## पशुसंवर्धन विभाग

कार्यालय दुरध्वनी :- (०२१६२) २३३७९३ E-mail -:dahosatara@gmail.com

**कालमर्यादा**

जा.क्र. कृषि/आस्था-१/कावि-२७४/२०१८
दिनांक :- २७: ०४ : २०१८

**प्रति,**

**गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती,----------------------------(सर्व) जिल्हा-सातारा**

विषय -: पशुसंवर्धन विभागाकडील संवर्ग- सर्वसाधारण बदल्या सन २०१८
संदर्भ -: महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५/५/२०१४ व शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/ प्र.क्र.१३६/ आस्था-१४ दिनांक ०२/०१/२०१७

ग्राम विकास व जल संधारण विभाग मुंबई यांचे उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयातील विहित केलेल्या सुधारीत धोरणानुसार व त्यामध्ये विहीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही पूर्ण करणेबाबत कळविले आहे.

आपल्यास्तरावरुन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, दिनांक १५ मे २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील सुधारीत तरतुदीनुसार, **सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक**, व्रणोपचारक या संवर्गातील कर्मचारी यांची अनुक्रमे प्रशासकीय, विनंती बदलीसाठी बदलीपात्र कर्मचारी यांची तात्पुरती वास्तव सेवा जेष्ठता यादी तयार केली असून, ती यासोबत पाठविण्यात आली आहे. **तसेच सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या <u>www.zpsatara.gov.in</u> या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे.** तरी वरील संवर्गाच्या तात्पुरत्या वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून, तात्पुरती वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणल्याबाबत सर्व संबंधिताच्या स्वाक्षरी घेण्यात यावी. तसेच सदर यादीबाबत कर्मचारी यांच्या काही हरकती/सुचना/आक्षेप आणि तक्रारी असल्यास त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह दिनांक ०३/०५/२०१८ पर्यत आस्थापना लिपीकाने समक्ष या कार्यालयास सादर करुन, संबंधितांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेली वास्तव्य सेवा जेष्ठता यादी या कार्यालयास दिनांक ०३/०५/२०१८ रोजी सादर करावी. वरील विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकतींचा विचार केला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार उदभवल्यास त्यास सर्वस्वी आपले कार्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

तरी वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन, वरीलप्रमाणे विहित केलेल्या मुदतीत, हरकती/ सुचना/ आक्षेप व तक्रारी, त्याबाबतचे पुरावे याची माहिती व संबंधितांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेली वास्तव्य सेवा जेष्ठता यादी सादर करणेची दक्षता घ्यावी.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा** करीता